# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १९–१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. गजानन ज्ञानू कोळेकर ,<br>मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी.ए. जाधव , सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. गजानन ज्ञानू कोळेकर , मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी आपली शेती बसाप्पावाडी गट क्र. १७९ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंप विद्युत पुरवठा मिळणेसाठी दि. ३०.१२.२००९ ला वितरण कंपनीकडे अर्ज केला व फी रु. ५०/– पोष्टाच्या मनिऑर्डरने पाठविली आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र १२३ दि. ४.१.२०१० नुसार कृती मानके (विद्युत पुरवठ्याचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५, परिशिष्ट अ नुसार कृती मानके साध्य करण्यात वि.प.स अपयश आल्यास नुकसान भरपाई द्यावी असे आदेश दिले. तक्रारदाराने झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी मंचासमोर आपल्या दि. ११.२.२०१० च्या तक्रारीत करण्यात आली आहे व १ महिन्याच्या मुदतीनंतरच्या चलन मिळाल्याच्या विलंबाच्या कालावधीसाठी रु. १००/– प्रति आठवडा भरपाई मिळावी अशी विनंती केली.

वितरण कंपनीने नोटीस देवूनही ३.३.२०१० पर्यंत आपला लेखी अहवाल पाठविल्याचे दिसत नाही. सदरच्या तक्रारीची सुनावणी दि. २२.३.२०१० रोजी मंचासमोर ठेवण्यात आली होती, वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या विनंतीवरुन ती पुढे ढकलण्यात आली व ती दि. ५.४.२०१० रोजी सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. राखे, सहाय्यक अभियंता, कवठे महांकाळ उप विभाग व श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. राखे यांनी तक्रारदारास दि. १०.२.२०१०ला चलन देण्यात आले आहे असे सांगितले. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. ३०.१.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, तसे न झाल्याने कृती मानकाचा भंग झाला आहे त्यामुळे वि.प. नुकसान भरपाई देणेस जबाबदार आहे असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांना विलंबापोटी नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे आदेश

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदाराचा अर्ज प्राप्त झाल्याचे वि.प.ने मान्य केले आहे. वि.प.चे म्हणणे विचारांत घेता, अर्जदारास दि. १०.२.२०१० ला चलन दिले आहे असे प्रतिपादन केले आहे. तरीही १२ दिवसांचा विलंब होत आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३० दिवसांपर्यंत म्हणजे दि. ३०.१.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते. वि.प.ने विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिलेले नाही. अंतर्गत कक्षाने आपल्या दि. ४.१.२०१० च्या आदेशात विलंब झाला असेल तर भरपाई देणे योग्य होईल असे आदेश केले आहेत. तरीही वि.प.ने चलन देण्यास १२ दिवसांचा विलंब केला आहे त्याबाबत कुठलाही खुलासा केलेला नाही किंवा विलंबा बाबत विद्युत नियामक आयोगाकडून कलम ११.२ खाली माफीसाठी कांही कार्यवाही केली नाही. त्यामुळे २ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येवून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस १२ दिवसांचे म्हणजे २ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. २००/- नुकसान भरपाई द्यावी. सदर रकमेचे वीज बिलातून समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.४.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :